माहिती व तंत्रज्ञान (आय.टी) क्षेत्रातील व्यवस्थापन आणि अभियंता/कर्मचारी यांचेतील तक्रारींचे निवारण करण्याकरिता समन्वय समिती स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२२/काम-३
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : ०७/०३/२०१९.

<u>प्रस्तावना:</u>

माहिती तंत्रज्ञान व्यवसायात वेगाने बदल होत आहेत. या वेगवान बदलांमुळे आणि माहिती तंत्रज्ञान व्यवसायातील अडीअडचणींमुळे माहिती व तंत्रज्ञान (आय.टी.) क्षेत्रातील अभियंता/ कर्मचारी यांचे विविध प्रश्न उपस्थित झालेले आहेत. राज्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्र फार मोठे असून हया उद्योगामध्ये कार्यरत असलेल्या उच्च शिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सौहार्दाचे वातावरण टिकून राहून सदर व्यवसाय वृध्दिंगत राहण्यासाठी अभियंते/कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण देखील होणे आवश्यक आहे.

मा. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/०२/२०१९ रोजी विविध व्यवस्थापन प्रतिनिधी आणि अभियंते/कर्मचारी यांच्या सोबत घेतलेल्या बैठकीच्या वेळी झालेल्या चर्चेस अनुसरुन तक्रारींचे निराकरण करण्याकरिता शासन प्रतिनिधी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यवस्थापनाचे प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी यांची त्रिपक्षीय समिती स्थापन करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार त्रिपक्षीय समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अभियंता/कर्मचारी यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे त्रिपक्षीय समितीची स्थापना करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

अ) शासन प्रतिनिधी	
१) मा. आयुक्त (कामगार)	अध्यक्ष
२) कामगार उपायुक्त (औ.सं.),मुंबई	सदस्य सचिव
३) कामगार उपायुक्त, पुणे	सदस्य
ब) कामगार प्रतिनिधी	
१) श्री.पवनजीत माने, पुणे	सदस्य
२) श्री.देवांग दवे,मुंबई	सदस्य
३) श्रीमती शिवानी दाणी, नागपूर	सदस्य
४) श्री.रोहित हिमते, नागपूर	सदस्य

क) व्यवस्थापन प्रतिनिधी	
१) NASSCOM चे प्रतिनिधी	सदस्य
२) Mahratha Chamber of Commerce Industries and Agriculture (MCCIA) चे प्रतिनिधी	सदस्य
३) श्रीमती प्रेरणा होनराव, लातूर	सदस्य

२. समितीच्या आवश्यकते प्रमाणे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अन्य कोणत्याही व्यक्तीला निमंत्रित करता येईल.

३. कामगार उपायुक्त (औ.सं.) हे उपरोक्त समितीच्या बैठकीचे आयोजन करतील. समितीच्या अशासकीय सदस्यांना प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते देय असणार नाहीत.

समितीची कार्यकक्षा:

१) सदर समिती माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तक्रारींच्या अनुषंगाने संबंधीत आस्थापनांचे प्रतिनिधी आणि तक्रार करणारे अभियंता/कर्मचारी यांचे म्हणणे विचारात घेऊन आणि त्यांच्याशी विचार विनिमय करुन तक्रारींचे निराकरण करण्याचे कार्य करेल.

२) ज्या समस्यांचे निराकरण समिती स्तरावर होऊ शकत नाही आणि याकरिता काही धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे शासनास शिफारस करील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१३०४१९००१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2019.03.07 13:06:29 +05'30'

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद
५) सर्व सन्माननीय संसद सदस्य / विधानसभा सदस्य/ विधान परिषद सदस्य

६) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक
७) कामगार आयुक्त, कामगार भवन, मुंबई
८) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
९) सर्व अपर कामगार आयुक्त/कामगार उपायुक्त,
१०) कामगार उपायुक्त (औ.सं.), मुंबई
११) कामगार उपायुक्त, पुणे
१२) संबंधित सदस्य (पत्राने)
१३) निवड नस्ती (कामगार-३).